
# महाराष्ट्रातील परिवर्तनाच्या चळवळी आणि मराठी साहित्य

डॉ. भारत हंडीबाग गौरवग्रंथ

संपादक

डॉ. हंसराज जाधव



Scanned with CamScanner

**डॉ. भारत हंडीबाग गौरवग्रंथ : महाराष्ट्रातील परिवर्तनाच्या चळवळी आणि मराठी साहित्य**

© डॉ. भारत हंडीबाग गौरवसोहळा समिती
७५८८४२९२२८

**अक्षरजुळणी**
कैलास बुक्स
छत्रपती संभाजीनगर

**मुखपृष्ठ**
सरदार जाधव

ISBN : 978-81-970947-1-2

**प्रकाशक**
के.एस.अतकरे
कैलाश पब्लिकेशन्स
छत्रपती संभाजीनगर
मो. ९३२५२१४१९१

**मुद्रक**
रुद्रायणी ऑफसेट,
छत्रपती संभाजीनगर

**प्रथमावृत्ती**
जुलै २०२४

मूल्य : 625/-

Scanned with CamScanner

## अनुक्रमणिका


संपादकीय

**विभाग १ : महाराष्ट्रातील चळवळी**

१) महात्मा फुले आणि ग्रामीण साहित्य — १७
डॉ. वासुदेव मुलाटे

२) महाराष्ट्रातील आदिवासी चळवळ आणि मराठी साहित्य — ३१
डॉ. विनायक तुमराम

३) आर्य समाज : एक समग्र सुधारवादी चळवळ — ६७
डॉ. चंद्रशेखर लोखंडे

४) प्रागतिक चळवळ आणि संविधानवादी साहित्य — ८२
डॉ. अनंत राऊत

५) शेतकरी कामगार पक्षाची चळवळ आणि मराठी साहित्य — ९२
डॉ. वसंत बिरादार

६) मराठी साहित्य आणि देवदासी मुक्ती चळवळ — १२२
डॉ. गायत्री गाडेकर

७) तृतीय पंथीयांची चळवळ व त्यांचे साहित्य - भरत गायकवाड — १३८

८) मराठा सेवा संघाचे सामाजिक, सांस्कृतिक आणि वाङ्मयीन योगदान — १५१
डॉ. हंसराज भोसले

९) पारध्यांच्या चळवळी आणि मराठी साहित्य -डॉ. राजेंद्र गवळी — १६१

**विभाग २ : मराठवाडयातील चळवळी**

१) मराठवाड्यातील सत्यशोधक समाजाची चळवळ — १७९
आणि मराठी साहित्य : प्रा.जी.ए.उगले

२) मराठवाड्यातील परिवर्तनाच्या चळवळीत वारकरी पंथाचे योगदान — २२८
डॉ.सतीश बडवे

३) विद्यापीठ नामांतर चळवळ आणि मराठी साहित्य — २३५
डॉ. ऋषीकेश कांबळे

४) मराठवाड्यातील महानुभाव साहित्य चळवळ — २४०
डॉ. संजय जगताप

५) मराठवाडयातील सुफी संतांची चळवळ आणि मुस्लिम — २५९
मराठी संतांचे योगदान : डॉ. शेख एजाज

६) मराठवाडयातील लिंगायत चळवळ आणि मराठी साहित्य — २७१
डॉ. राजू जूबरे


Scanned with CamScanner

# "मराठा सेवा संघ चळवळीचे सामाजिक, सांस्कृतिक योगदान"

डॉ. हंसराज दत्तात्रय भोसले

**प्रस्तावना -**

कृषक कुणबी समाजातील समविचारी सरकारी नोकरदार लोकांना एकत्रित करून आज जगभर ज्यांना युगपुरुष या नावाने ओळखले जाते,असे मा. पुरुषोत्तम खेडेकर साहेब यांनी अकोला येथे मराठा सेवा संघाची स्थापना केली.त्याला आता पस्तीस वर्षे पुर्ण झालेली आहेत. छ. शिवाजी महाराजांच्या नंतर मराठा समाज एका विचाराने एकत्र येऊ शकतो. समाजपरिवर्तनाचे, जनकल्याणाचे,काम करू शकतो. यावर आजही कोणाचा विश्वास बसत नाही. मात्र, सेवा संघाने तो विश्वास सार्थ करून दाखवलेला आहे. मराठा सेवा संघाने मागील पस्तीस वर्षांत सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रात जे काम केलेले आहे. तितके काम महाराष्ट्रात इतर कुठल्या संघटनेला करता आले आहे, असे चित्र आपणांस पहायला दिसत नाही. किंबहुना मराठा नाव असलेल्या इतराही अनेक संघटना निर्माण झाल्या आणि त्या कधी संपल्या हे कळलेदेखील नाही परंतु महाराष्ट्रात, महाराष्ट्राबाहेर, देशात आणि जगात विस्तारित झालेली आणि महाराष्ट्रात लोकप्रिय ठरलेली एकमेव संघटना म्हणून मराठा सेवा संघाकडे आज पाहिले जाते. एखादी संघटना किंवा चळवळ ३० वर्षापेक्षा अधिक काळ समाजात काम करते, समाजमनावर स्वतःचा मोठा प्रभाव टिकवून ठेवते. ही निश्चितच अभ्यास करण्यायोग्य, मूल्यमापन करण्यायोग्य अशी बाब आहे. असा अभ्यास, मूल्यमापन करण्याचे कारण म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष आणि कला शाखेचे अधिष्ठाता राहिलेले, डॉ.भारत हंडीबाग हे नुकतेच सेवानिवृत्त झाले. त्यांच्या सेवापुर्ती निमित्त समविचारी प्राध्यापक



Scanned with CamScanner

मित्रांनी 'महाराष्ट्रातील परिवर्तनाच्या चळवळी आणि मराठी साहित्य' या विषय शीर्षकाचा गौरव ग्रंथ काढण्याची संकल्पना मांडली. आणि त्याच्या पूर्ततेसाठी म्हणून गौरव समिती गठीत करून महाराष्ट्रातील साहित्यिकांकडून मराठी साहित्य आणि चळवळी या विषयाच्या अनुषंगाने लिहत्या हातांना एक संधी उपलब्ध करून दिली.त्याबद्दल प्रथमत : गौरव समितीतील सर्व सन्माननीय प्राध्यापक, संपादक यांचे मनपूर्वक आभार!. मी मराठा सेवा संघाच्या चळवळीशी मागील वीस वर्षांपासून जोडला गेलेलो असल्यामुळे आणि सेवा संघाच्या सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रमात प्रत्यक्षात सहभागी होत असल्यामुळे संयोजकांना प्रस्तुत विषयावर लेख लिहावा, अशी अपेक्षा माझ्याकडून असावी, त्यामुळेच संयोजकाच्या विनंती आग्रहामुळे मी प्रस्तुत लेख लिहिला आहे. तो परिपूर्ण आहे, असे माझे अजिबात म्हणणे नाही. मला काम करताना जे जाणवले, जे खटकले त्यावर ही मी माझे मत नोंदविले आहे. एकूण मराठा सेवा संघ या चळवळीचा इतिहास, या चळवळीने वैचारिक, सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रात, जे मूलभूत परिवर्तनाचे कार्य केले आहे, त्याला तोड नाही. त्यानुषंगाने मराठा सेवा संघांच्या चळवळीचे संक्षिप्त स्वरूपात मूल्यमापन करण्याचा प्रयत्न केला आहे. हे वाचकांनी लक्षात घ्यावे.

**मराठा सेवा संघाच्या स्थापनेचा इतिहास -**

३१ ऑगस्ट १९९०रोजी मराठा सेवा संघ महाराष्ट्र, या नावाने सेवा संघाची नोंदणी झाली. (नों.क्र.३०३८) आणि १ सप्टेंबर १९९०रोजी संस्थापक अध्यक्ष युगपुरुष पुरुषोत्तम खेडेकर यांनी कृषक कुणबी समाजातील निर्मलकुमार देशमुख, हनुमंतराव देशमुख, वसंतराव बेडसे, डॉ.रामराव भोळे, साहेबराव पाटील, दिलीप साबळे, भगवंतराव सातारकर, जगतराव जायले, कुमुदिनी देशमुख, सुधीर बेनके, रामेश्वर फुंडकर, उत्तमराव नाडे, अण्णासाहेब डांगे, प्रभाताई बाळ सराफ आणि बाळासाहेब लुंगे इत्यादी सहकाऱ्यांच्या सोबतीने मसेसं स्थापना केली. ०१ सप्टेंबर हा दिवस मसेसं वर्धापन दिवस म्हणून महाराष्ट्रासह इतर राज्यात ही उत्साहाने साजरा केला जातो.

मसेसंच्या स्थापनेला आता पस्तीस वर्षे झाली आहेत. वर्तमानकाळात मसेसं ही संघटना/ चळवळ महाराष्ट्रातील परिवर्तनाची लोकचळवळ



Scanned with CamScanner

म्हणून प्रभावी नेतृत्व करीत आहे. म्हणून या चळवळीचे स्वरूप/ रचना समजून घेणे आवश्यक आहे.

**मसेसं चळवळीची रचना व स्वरूप -**

'प्रबोधनातून परिवर्तन' आणि ३२ कक्ष. हा मसेसंचा कृती कार्यक्रम आहे. या कृतीकार्यक्रमातून समाजातील सर्व प्रकारच्या दोषाचे निराकरण करण्यासाठी मसेसचा विस्तार पुढील ३२ कक्षात झाला.

जिजाऊ ब्रिगेड,
संभाजी ब्रिगेड,
वीर भगतसिंग विद्यार्थी परिषद,
राजर्षी शाहू शिक्षण परिषद,
डॉ. पंजाबराव देशमुख शिक्षक परिषद,
जगतगुरू तुकोबाराय साहित्य परिषद,
संत नामदेव वारकरी परिषद,
पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे कृषी परिषद,
सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील सहकार कक्ष,
तानुबाई बिर्जे पत्रकार परिषद,
मराठा वसतिगृह कक्ष,
मराठा न्यायदान कक्ष,
मराठा गृहनिर्माण कक्ष,
मराठा विद्या दत्तक योजना,
मराठा समेट कक्ष,
मराठा उद्योजक कक्ष,
मराठा समन्वयकक्ष,
संत गाडगेबाबा प्रबोधन कक्ष,
मराठा विचारवंत कक्ष,
म. फुले इतिहास अकादमी,
मराठा आरोग्य कक्ष,
मराठा बालकल्याण कक्ष,
मराठा व्यसन मुक्ती कक्ष,



Scanned with CamScanner

मराठा अर्थ कोश कक्ष,

मराठा वधू-वर कक्ष,

मराठा विज्ञान तंत्रज्ञान कक्ष

जिजाऊ सृष्टी शिवधर्म पीठ

संगीतसूर्य केशवराव भोसले कला संस्कृती कक्ष

विश्व शाहीर परिषद

शिवव्हाइस

शिवराज्य पार्टी आणि

छ. शिवाजी मुस्लीम ब्रिगेड.

**मसेसं स्थापने पूर्वीची पार्श्वभूमी -**

मराठा सेवा संघाची स्थापना जागतिकीकरणाच्या समांतर काळात म्हणजे नव्वदच्या दशकात झाली. १९९०- ९१ला भारताने मिश्र अर्थव्यवस्था स्वीकारली होती. 'खाऊजा' धोरणाचा हा प्रारंभ काळ होता. या पार्श्वभूमीवर मसेसंचे सामाजिक, सांस्कृतिक योगदान पाहण्यापूर्वी मराठा जागृतीचे काही प्रयत्न स्वातंत्र्यापूर्वीच्या आणि नंतरच्या काळात झालेले होते.मराठा समाजाच्या कर्तृत्व आणि मर्यादा, मराठा समाजाची जागृती आणि संघर्ष हे संक्षेपाने पाहणे गरजेचे आहे.

महाराष्ट्रातील सामाजिक, सांस्कृतिक संघर्षाच्या इतिहासाचे टप्पे -

पाच हजार वर्षांपासूनचा वैदिक - अवैदिक यांच्यातील सांस्कृतिक संघर्ष. १२व्या शतकांपासून १६व्या शतकापर्यंत संतांचा सामाजिक,आध्यात्मिक संघर्ष. छत्रपती शिवाजी महाराजांचा राजकीय, सांस्कृतिक संघर्ष. महात्मा फुले यांचा, धार्मिक,सांस्कृतिक संघर्ष. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा समग्र मानवजातीसाठी लोकशाही मुल्यांसाठीचा संघर्ष. छत्रपती शाहू आणि सयाजीराव गायकवाड महाराजाचा राजेशाहीत लोकशाही मूल्ये रुजवण्यासाठीचा संघर्ष. असे सामाजिक, सांस्कृतिक संघर्षाचे टप्पे पहिल्या नंतर २१ व्या शतकात मराठा सेवा संघाने सत्यशोधकीय धर्म - बौद्ध धर्म आणि शिवधर्म असा फार मोठा पल्ला गाठला आहे. हे मागील पस्तीस वर्षांच्या मसेसंने केलेल्या सामाजिक, सांस्कृतिक कार्याच्या मूल्यमापनावरून सहज लक्षात येते.

**मराठा समाजाच्या जागृतीचा काळ -**



Scanned with CamScanner

१८१८ नंतर मराठा समाजाच्या कर्तबगारीला ओहोटी लागली होती.१८१८ पर्यंत मराठे हे दिल्लीचे पालनहार होते. मात्र, पेशवाईच्या उदयानंतर मराठ्यांच्या ऱ्हासाला सुरुवात झाली. त्यानंतर एक शतकभर पुढे हीच परिस्थिती राहिली.१९१८ मध्ये पुन्हा महाराष्ट्राच्या समाजकारणात,राजकारणात पुढारलेपण करण्याची संधी मराठ्यांना मिळाली. आणि मराठा समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी त्याच्या विकासासाठी समाजातील पुढाऱ्यांनी एकीकडे संस्थात्मक कामाच्या उभारणीला व दुसरीकडे साहित्य लेखनाच्या माध्यमातून समाजात जाणीव जागृती करण्यास सुरुवात केली. उदाहरणादाखल सांगायचे म्हण्टले तर, यामध्ये म. फुले यांच्या सत्यशोधकी विचारांच्या प्रेरणेतून छ. शाहू महाराजांच्या काळात जाधव - जेधे - जवळकर, नारायण मेघाजी लोखंडे यांनी प्रचंड प्रबोधन केले व साहित्य निर्मिती ही केली. वि. रा. शिंदे यांनी अस्पृश्यता निवारणाचे काम प्रामुख्याने केले.

शेटजी, भटजीच्या विरोधात ब्राह्मणेत्तर चळवळ१८९०च्या आधी उभी होती. मराठा नेतृत्वाने सत्ताधारी वर्गाने सत्तेसाठी शेटजीशी साटेलोटे केले आणि भटजीची सांस्कृतिक मूल्य मिरवण्यात धन्यता मानली. हे विदारक वास्तव आजही बदलले दिसत नाही. 'मराठा समाज बुद्धीने वागण्याऐवजी रगेलपणात सर्व जिरवण्याच्या सवयीच्या आहारी गेला.

मराठा सेवा संघाच्या या चळवळीने मराठा समाजाच्या या रगेलपणावर नेमकेपणाने बोट ठेवले आणि मराठा समाजाचा खरा मूळ इतिहास पुन्हा त्यांच्या समोर आणला आणि त्यांच्यातील रग जिरवून त्यांना बुद्धीच्या वाटेवर आणले. ही मागील पस्तीस वर्षातील मराठा सेवा संघाच्या चळवळीचे सर्वात मोठे यश म्हणावे लागेल.

मध्ययुगीन सरंजामी मूल्य व्यवस्थेतून मराठ्यांना बाहेर काढण्याचे कार्य –

१९७८ च्या सार्वजनिक निवडणुकीतून मराठा समाजाला फार मोठा धडा भेटला. कोणत्याच पक्षाला स्पष्ट बहुमत मिळाले नाही. वसंत दादा पाटील यांच्या नेतृत्वात सरकार स्थापन झाले खरे ; पण शरद पवार काँग्रेसमधून बाहेर पडले. आणि 'पुलोदचे' सरकार पवारांनी निर्माण केले. दोन वर्षांनी पुन्हा शरद पवार सरकार यांचे जाऊन बॅरिस्टर अंतूले हे



Scanned with CamScanner

मुख्यमंत्री झाले. या सर्व सत्तासंघर्षात मराठा नेतृत्व गटागटात विखुरले गेले. ते आजतागायत एकत्र येऊ शकले नाही.मराठा सेवा संघ निर्मिती पूर्वीची १९७८ ची निवडणूक मराठा समाजाच्या कर्तृत्वावर आणि अस्तित्वावर अनेक प्रश्न उपस्थित करणारी ठरली आणि त्यावर उपाय सुचवणारी ही ठरली. त्यात प्रामुख्याने १.डॉ. आ. ह. साळुंखे -यांनी मराठ्यांच्या या वृत्तीवर नेमकेपणाने बोट ठेवत मध्ययुगीन मूल्य आणि सरंजामी प्रवृत्तीने ग्रासलेल्या मराठा समाजाला जागृत करण्यासाठी डॉ. आ. हं. साळुंखे यांनी 'सत्ता गेली हीच मराठा समाजाला सुवर्ण संधी ' (१९८१)असा दीर्घ लेख लिहून घणाघाती टीका केली. यामुळे महाराष्ट्रात वादळ निर्माण झाले. आ. ह. साळुंखे यांच्या लेखाच्या समर्थनात आणि विरोधात किर्लोस्करच्या कार्यालयात पत्राचा पाऊस पडला.

२. बाबा आढाव - यांनी १९७८ च्या निवडणुकीपूर्वीच 'हे तर शेटजी भटजी चे आधुनिक दासच! '( १९७१) असा साप्ताहिक साधना मध्ये लेख लिहिला होता. त्यानंतर विशेषत:' देशमुख मराठा स्त्रियांचे दास्य असा आणखीन एक लेख लिहून महाराष्ट्राचे समाज मन ढवळून काढले होते.त्यानंतर

३.अनंतराव पाटील - ज्येष्ठ पत्रकार आणि खासदार असलेल्या अनंतराव पाटील यांनी (१९८७) 'मराठा समाज' या पुस्तिकेतून सद्य:स्थितीचा वृत्तांतच मांडला.

४. सदानंद मोरे - महाराष्ट्रातील थोर विचारवंत आणि संत साहित्याचे अभ्यासक, मोरे यांनी 'मराठा नायक' या लेखात मराठीतील प्रादेशिक कादंबरी लेखन करणारे र. वा. दिघे यांच्या कादंबऱ्यात प्रथमत: मराठा नायक अवतरल्याचा उल्लेख केला होता.

५.भा. ल. भोळे - यांनी 'मराठा-मराठेतर वाद' या आपल्या लेखात महत्त्वपूर्ण भाष्य केले आहे.१९७८पयषत मराठा कुणबी यांचे प्रभुत्व यशवंतराव चव्हाण यांच्यामुळे टिकून होते. मात्र शरद पवार यांच्या बंडखोरीमुळे मराठा नेतृत्व कायमचे विस्कळीत झाले. हे भा. ल. भोळे यांचे निरीक्षण पाहता आजच्या वर्तमान राजकारणाचा जो खेळखंडोबा झाला आहे. त्याची बीजे १९७८च्या निवडणुकीत दिसतात. आजचे मराठा नेतृत्व देखील आरक्षणाच्या केंद्रबिंदूपाशी एकवटून नेतृत्व पुन्हा



Scanned with CamScanner

एकदा त्याच मराठा - मराठेतर वादात अधिक अडकून पडल्याचे वास्तव समोर आहे.

६. प्रा. रंगनाथ पठारे - मराठीतील प्रथितयश कादंबरीकार रंगनाथ पठारे यांनी( १९४२- ८०) पर्यंतच्या महाराष्ट्राच्या सामाजिक राजकीय पटाचा विस्तार आपल्या ताम्रपट कादंबरीतून केला. या कादंबरीचा नायक आणि कथानक मराठा समाजच असल्याने तो मराठा समाजाचा विस्तार आहे. स्वातंत्र्यानंतरच्या चाळीस-पन्नास वर्षांत महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात झालेल्या सर्वकष परिवर्तनाचे केंद्र राहिलेल्या मराठा लॉबीचे प्रभावी चित्रण पठारे यांनी ताम्रपटात केले आहे.

७. १९९८ मध्ये येवल्यावरून अर्जुन कोकाटे व भास्कर कोल्हे यांनी मिळून' मराठा जात आणि कर्तृत्व मर्यादा ' हा दिवाळी विशेषांक प्रकाशित केला.

८. कुमार सप्तर्षी - यांनी सत्याग्रही विचारधारामध्ये 'पावर आणि वावर' या लेखात मराठ्यांची पाळेमुळे घट्ट जमिनीत रुजलेली आहेत. त्यामुळे महाराष्ट्राचे सामाजिक, सांस्कृतिक परिवर्तन मराठ्यांना वगळून करता येत नाही. म्हणून मराठा तरुण जितका क्रांतिकारक होईल तितका महाराष्ट्र क्रांतिकारक होईल, असे आपले मत व्यक्त केले होते.

९. प्रा. शेषराव मोरे- हे सावरकरांचे अभ्यासक मानले जातात. शिवाय शेती विषयक ही त्यांचा चांगला अभ्यास आहे. त्यानी 'मराठ्यांचे भवितव्य' या आपल्या लेखात वेगळी मांडणी करतांना मराठा समाज ज्ञानार्जनापासून दूर आहे. त्यांनी मराठा अस्मिता सोडून हिंदू अस्मितेशी जोडून घ्यावे. असे मत नोंदवले आहे.

मोरे यांच्या पहिल्या विधानाशी सहमती दर्शवता येईल मात्र त्यांचे दुसरे विधान न स्वीकारण्याचे आहे.

१०. पत्रकार वरूणराज भिडे - यांनी 'साधनामधून' जातवास्तव सदर लिहले. त्यात त्यांनी मराठा समजाने संख्येच्या जोरावर, बळावर राजकारणात पकड निर्माण केली नसून, त्यात त्यांचे कर्तृत्व मोठे असल्याचा निष्कर्ष काढला आहे. तो आज मनोज जरांगे यांच्या आरक्षण आंदोलनामुळे सत्यात उतरत आहे. असे चित्र महाराष्ट्रात पाहावयास मिळत आहे. महाराष्ट्रातील मराठा तरुणच नव्हे तर सकल मराठा समाज आज महाराष्ट्रातील



Scanned with CamScanner

मराठा नेतृत्व नाकारत आहे. स्वातंत्र्यानंतर राजकारणी लोकांची तळी उचलण्याचे काम पहिल्यांदाच नाकारत आहे. हे कृषक समाजातील निस्वार्थ सामाजिक नेतृत्व मा. मनोज जरांगे यांच्यामुळे. हेही आपण नीट समजून घ्यायला हवे.

वरील सर्व पार्श्वभूमीवर मराठा सेवा संघाची स्थापना होण्यापूर्वीची महाराष्ट्रातील जागृती पाहिल्यानंतर मराठा सेवा संघाच्या चळवळीच्या कार्याचा संक्षेपाने आढावा घेणे उचित ठरेल.

**मराठा सेवा संघ प्रबोधनाचे नवे पर्व -**

मसेसंची स्थापना १९९० ला झाली असली, तरी २००० सालापासूच खऱ्या अर्थाने सेवा संघाच्या नव्या पर्वाला सुरुवात झाली. सेवा संघाच्या सांस्कृतिक लढाईचे पहिले केंद्र भांडारकर संशोधन केंद्रावरील २००४च्या हल्ल्यापासून झाली. जेम्स लेन या नावाने ते प्रकरण संपूर्ण महाराष्ट्राला माहिती आहे. त्याच्या फार खोलात इथे जात नाही.

२१व्या शतकाला सुरुवात होण्याच्या दोन वर्षांआधी मराठा सेवा संघाने फार मोठी घोषणा केली. ती घोषणा म्हणजे 'मराठा शिवधर्माची घोषणा' अशा पद्धतीने आधुनिक काळात. एखाद्या संघटनेने आपल्या पंधरा - वीस वर्षांच्या सामाजिक, सांस्कृतिक कार्याच्या आधारावर नव्या धर्माच्या निर्मितीची घोषणा करणे हीच मुळात क्रांतिकारक घटना होती . या क्रांतीकारी घटनेची सुरुवात मात्र ठाणे येथून नोव्हेंबर २००१ मध्ये साप्ताहिक शिवधर्मच्या निर्मितीने झाली. पुढे शिवधर्म संस्थापनार्थ १९ फेब्रुवारी २००२मध्ये जिजाऊ रथ यात्रा, मराठा जोडो अभियानाने महाराष्ट्रभर वातावरण निर्मिती केली व समाजमन तयार केले. पुढे महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांच्या ठिकाणी विचारविनिमय करण्यासाठी समाजातील विचारवंत, अभ्यासक, कार्यकर्ते यांच्या शिवधर्म निर्मितीसाठीच्या बैठका घेण्यात आल्या.

**शिवधर्म निर्मितीच्या बैठका -**

१३ व १४ जुलै २००२ रोजी जळगाव येथे धर्मशास्त्राचे प्रगाढ पंडित आणि अभ्यासक डॉ. आ. ह. साळुंखे यांच्या अध्यक्षतेखालील पहिल्या बैठकीतील चिंतनातून शिवधर्माचे प्रेरणास्थान म्हणून जिजाऊंस मानावे, असा सर्वानुमते ठराव पास करण्यात आला. नेताजी गोरे यांनी शिवधर्म



Scanned with CamScanner

समन्वयक म्हणून जबाबदारी स्वीकारली. त्यानंतर महाराष्ट्रासह इतर राज्यांत जागृती करण्यासाठी व विचारमंथन करण्यासाठी शिवधर्म परिषदेचे आयोजन करण्यात आले.

१.पहिली शिवधर्म परिषद -तुळजापूर ( २४-२५ऑगस्ट २००२)

२.दुसरी शिवधर्म परिषद -अकोला ( १२-१३ ऑक्टोबर २००२)

३. तिसरी शिवधर्म परिषद - चंद्रपूर ( २६-२७ ऑक्टोबर २००२)

वरील तीन परिषदतून शिवधर्माचे स्वरूप निश्चित करण्यात आले.

४.सप्टेंबर २००३ मध्ये शिवधर्माची आचारसंहिता असलेल्या शिवधर्म गाथा लिखाणाची बैठक होऊन त्याची पहिली संहिता प्रकाशित करण्यात आली.

५.१२ जानेवारी २००५ मध्ये जिजाऊ जन्मोत्सव, सिंदखेड राजा येथून शिवधर्म प्रकटन सोहळ्याचे आयोजन व प्रतिज्ञा सगळ्यांना देण्यात आली.

या सर्व सांस्कृतिक घटना घडामोडीनंतर २००५ ते २००७ या दोन वर्षांत पुन्हा रथयात्रा काढून महाराष्ट्रासह पाच राज्यातून व्यापक जनमत व पाठिंबा मिळवण्यात मराठा सेवा संघाच्या चळवळीला मोठे यश प्राप्त झाले. त्यानंतर देवानंद कापसे यांच्या अध्यक्षतेखाली सप्टेंबर २००७ मध्ये शिवधर्म पीठावर (सिंदखेड राजा, जि. बुलडाणा ) पहिले अधिवेशन संपन्न झाले..

१२ जानेवारी २०१३ पर्यंत शिवधर्म गाथा परिपूर्ण करण्यासाठी अनेक बैठका घेऊन शिवधर्म गाथेला शिवधर्म संसदेची मान्यता घेण्यात आली. व १२ जानेवारी २०१३ रोजी मातृतीर्थ सिंदखेडराजा येथून शिवधर्म पीठावरून ती प्रकाशित करण्यात आली.

२००० ते २०१५ हा कालखंड मराठा सेवा संघाच्या विस्ताराचा, कालखंड आहे. याच काळात सेवा संघ गाव खेड्यापर्यंत पोहचला. सेवा संघाच्या ३२ कक्षाच्या माध्यमातून महाराष्ट्रभर आणि जगात देखील तथागत गौतम बुध्यांपासून चालत आलेला मानवतेचा, समतेचा विचार, जगतगुरु विद्रोही संत तुकोबाराय, कबीर, छत्रपती शिवराय, शाहू, फुले, आंबेडकर इत्यादी महामानवांनी मांडलेला विवेकी विचाराचा जागर मराठा सेवा संघाने प्रबोधन, परिवर्तन आणि साहित्य निर्मितीच्या माध्यमातून



Scanned with CamScanner

प्रभावी केला.

**समारोप :**

**मराठा सेवा संघाची उपलब्धता -**

मागील पस्तीस वर्षात मराठा सेवा संघाने जगातील कोणत्याही चळवळीपेक्षा, संघटनेपेक्षा, प्रबोधनाच्या इतिहासात स्वतःचे अग्रगण्य असे स्थान निर्माण केले आहे.आपल्या ३२ कक्षांच्या माध्यमातून राजकारण, अर्थकारण, उद्योग, व्यवसाय,आरोग्य,बेरोजगारी, शिक्षण, कला संस्कृती, विज्ञान तंत्रज्ञान, इत्यादी ज्ञानाच्या सर्व क्षेत्रात स्वतःची नाममुद्रा उमटविली आहे. भांडारकर वरील हल्यापासून मसेसंचा सांस्कृतिक संघर्ष आजही आरक्षणाच्या माध्यमातून सुरूच आहे. मसेसं पुर्ण ताकतीने ही वैचारिक लढाई लढत आहे. भांडारकर हल्यानंतर मराठा समाजाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला. आज पुन्हा मनोज जरांगे पाटील यांच्या लढ्याने हा सांस्कृतिक संघर्ष एका वेगळ्या वळणावर, निर्णायक वळणावर उभा आहे. या सगळ्याचे श्रेय मराठा सेवा संघाने मागच्या पस्तीस वर्षात समाज बांधवामध्ये जे सामाजिक, वैचारिक आत्मभान प्राप्त करून दिले आहे. त्याला जाते. त्यामुळेच आज सकल मराठा समाज लाखोच्या संख्येने एकत्र आलेला दिसतो.

संपर्क : ९९७०१६४४९१



Scanned with CamScanner



डॉ. भारत हंडीबाग

गेल्या अनेक शतकापासून महाराष्ट्रात महानुभाव, वारकरी, शेतकरी, सत्यशोधक, हैद्राबाद मुक्ती आंदोलन, विद्यापीठ नामांतर चळवळ इथपासून ते अगदी अलिकडच्या मराठा सेवासंघ, आरक्षण यासंदर्भातल्या अनेक चळवळी सुरू आहेत. त्यांची मूल्ये अबाधित ठेवून अव्याहत झपाटलेपणाने अनेक परिवर्तनवादी विचारवंत अभ्यासक, कार्यकर्ते शहरी, ग्रामीण, आदिवासी भागात, वाडी तांड्यावर जाऊन, विविध जातीधर्मांच्या लोकांत मिसळून कार्यरत आहेत. सर्व जातीधर्मातील जी बुरसटलेली व्यवस्था आहे त्यापासून प्रत्येकजण हेतूतः दूर जातोय आणि आपले स्वतःचे अस्तित्त्व टिकवण्याचा प्रयत्न करतोय.

हेतूतः काही प्रतिगामी चळवळी बहुतेक पुरोगामी सामाजिक चळवळींना दाबून टाकण्याच्या प्रयत्नात आहेत. पण त्यावरही स्वार होवून या चळवळी 'फिनिक्स' पक्षाप्रमाणे पुन्हा नव्याने समाज एकत्र कसा येईल याचा प्रयत्न करीत आहेत हेच या चळवळींचे फलित आहे.

या सर्व गोष्टींचा प्रभाव त्या त्या काळातल्या मराठी साहित्यावर पडला आहे. या परिवर्तनाच्या चळवळींचं, कार्यकर्त्यांच्या संघर्षाचं प्रतिबिंब बहुतेक मराठी साहित्यात पडलेलं आहे. हा चळवळीचा आणि मराठी साहित्याचा अनुबंध शोधणं हाच 'महाराष्ट्रातील परिवर्तनाच्या चळवळी आणि मराठी साहित्य' या ग्रंथाचा हेतू आहे.

माझा प्रिय विद्यार्थीमित्र प्रोफेसर भारत हंडीबाग यांच्या सेवापूर्तीच्या पार्श्वभूमीवर हा गौरवग्रंथ प्रकाशित होतोय याचा आनंद आहे. यासाठी संपादक मंडळ आणि संयोजकांचे अभिनंदन!

**- प्राचार्य, मधुकर गायकवाड**

माजी कुलगुरू,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,
नांदेड

₹ 625

ISBN 978-81-970947-1-2

कैलाश पब्लिकेशन्स
www.kailashpublications.com

Scanned with CamScanner